# रेशीमबाग मैदानावर पुन्हा आनंद मेळाव्यासाठी खोदकाम

## नागेश सहारे देणार आयुक्तांना निवेदन

नागपूर, दि. २४ : खेळाचे मैदान असतानाही उत्सवाच्या निमित्ताने आनंद मेळाव्यासाठी मैदान उपलबद्ध करून देण्यात येत असल्यामुळे क्रीडा प्रेमींनी त्याचा विरोध केला आहे. नगरसेवक नागेश सहारे यांच्याकडे क्रीडा प्रेमींनी कैफियत मांडली असून यासंदर्भात स्वतः नगरसेवक नागेश सहारे आयुक्तांना निवेदन देणार आहेत.

क्रीडा प्रेमींनी आनंद मेळाव्यावर आक्षेप घेतल्यानंतर नगरसेवक नागेश सहारे यांनी आयुक्त अभिजीत बांगर, माजी महापौर तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके तसेच नासुप्रच्या अधिकाऱ्यासोबत चर्चा केली. जनक्षोभ भडकण्यापूर्वी परवानगी रद्द करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. उद्या यासंदर्भात ते निवेदन देणार आहेत.